# ANAMPREM NEWS LETTER

## अनामप्रेम स्नेह - वार्ता

**WWW.ANAMPREM.ORG** मासिक पत्रिका - मे 2025



**दिव्यांग बांधवांच्या शिक्षण, प्रशिक्षण व पुनर्वसनासाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास' प्रवरा मेडिकल कॉलेज, लोणी येथील नर्सिंग कोर्सचे विद्यार्थी व कर्मचारी यांची प्रेरणादायी भेट..!**





**अनामप्रेम ग्राम प्रकल्पातील गोशाळेस डॉक्टर प्रशांत जोगी (संभाजीनगर) यांची अभ्यासपूर्ण भेट!**

**जनावरांना आयुर्वेदिक उपचार देणारे प्रसिद्ध डॉक्टर प्रशांत जोगी व त्यांच्या सहकाऱ्यांनी गोशाळा विभागास भेट देऊन जनावरांचे संगोपन, योग्य आहार व उपचार पद्धती यावर मार्गदर्शन केले.**



**'उडान' (रुशिल मल्टीपर्पज फाउंडेशन, जळगाव) संस्थेच्या प्रतिनिधींची सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास सदिच्छा भेट!**

उडान (रुशिल मल्टिपर्पज फाउंडेशन), जळगावचे संस्थापक सौ. चौधरी मॅडम व सहकाऱ्यांनी सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास सदिच्छा भेट दिली. अभय रायकवाड सरांनी संस्थेच्या कार्याची माहिती दिली व प्रकल्पातील विविध उपक्रमांचे प्रत्यक्ष दर्शन घडवले. संपूर्ण प्रकल्प पाहून पाहुणे भारावून गेले व भविष्यात आवश्यकतेनुसार सहकार्याची हमी देत त्यांनी समाधानपूर्वक निरोप घेतला.



## सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पास प्रतिष्ठित शासकीय अधिकाऱ्यांची भेट!

अनामप्रेम संस्थेच्या सत्यमेव जयते ग्राम प्रकल्पाला माननीय श्री. गिरीश कुलकर्णी, श्री. भरत कुलकर्णी यांच्या प्रमुख उपस्थितीत यशदा, पुणे या संस्थेचे वरिष्ठ आयएएस अधिकारी व महासंचालक श्री. निरंजन सुधांशू, अतिरिक्त महासंचालक श्रीमती पवनीत कौर, व वर्ग एकचे अधिकारी मा. प्रज्ञा दासरवार, मा. कल्याणी गोखले, मा. अनिता महिरस यांनी सदिच्छा भेट दिली.



**प्राचार्य श्रीयुत राजेंद्रजी. पी. पवार . शिवछत्रपति महाविद्यालय सिडको, छ. संभाजीनगर यांच्या समवेत मा.जे आर.मंत्री**

Scanned with OKEN Scanner

# शिक्षणात उत्कृष्टतेची झेप – अनामप्रेमच्या विद्यार्थ्यांचे दहावी व बारावीमध्ये चमकदार यश..!






राज्यातील दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेतील विद्यार्थ्यांनी यावर्षीही दहावीच्या परीक्षेत अभिमानास्पद यश संपादन करत संस्थेची मान उंचावली आहे. अंध आणि मूकबधिर अशा दोन गटांतील एकूण ९ विद्यार्थ्यांनी आपल्या अपंगत्वावर मात करत ही कृतार्थता मिळवली आहे. हे केवळ शैक्षणिक यश नसून, त्यांच्या जिद्द, चिकाटी, मेहनत आणि आत्मविश्वासाचे प्रतीक आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांच्या अथक प्रयत्नांसोबतच शिक्षकांचे मार्गदर्शन आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. विशेषत: अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक म्हणून कार्य करणाऱ्या मा. मिलन गंधे मॅडम, मा. गीता महाजन मॅडम, मा. ज्योती पुरी मॅडम, मा. स्वाती रानडे मॅडम व मा. चेतन लांडगे सर यांचे योगदान उल्लेखनीय आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांसाठी रायटर म्हणून काम करणाऱ्यांचेही कार्य वाखाणण्याजोगे आहे.

संस्थेचे अध्यक्ष इंजी. अजित माने यांच्यासह डॉ. प्रकाश शेठ, डॉ. बापूसाहेब कांडेकर, डॉ. गिरीश कुलकर्णी, गोपीनाथ सरफरे, डॉ. मेघना मराठे, डॉ. रविंद्र सोमाणी, सीए अशोक पितळे, इंजी. अविनाश बोपर्डीकर, डॉ. सायली सतीश सोमण व अनिल गावडे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन केले आहे.

दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी कार्यरत असलेल्या अनामप्रेम संस्थेतील दिव्यांग विद्यार्थ्यांनी बारावी बोर्ड परीक्षेत याही वर्षी अभिमानास्पद कामगिरी करत संस्थेची मान उंचावली आहे. संस्थेतील अंध आणि मूकबधिर गटातील एकूण दहा विद्यार्थ्यांनी अपंगत्वावर मात करत बारावी परीक्षेत हे यश संपादन केले आहे. हे केवळ परीक्षेतील यश नाही, तर त्यांची जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वास यांच प्रतीक आहे.

या यशामागे विद्यार्थ्यांच्या शिक्षकांचे योगदान, संस्थेतील पदाधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन व मा. मिलन गंधे मॅडम, मा. गीता महाजन मॅडम, मा. ज्योती पुरी मॅडम, मा. रितीका पुरी मॅडम, मा. चेतन लांडगे सर यांनी अंध विद्यार्थ्यांसाठी वाचक म्हणून केलेलं कार्य तसेच अंध विद्यार्थ्यांचे रायटर या सर्वांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे.

विद्यार्थ्यांनी दाखवलेल्या जिद्दीला सलाम..! त्यांच्या यशाची ही कहाणी इतरांसाठीही प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.
अनामप्रेमच्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन व त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी खूप शुभेच्छा..!



Scanned with OKEN Scanner

# Highlights

www.anamprem.org



**Exide Industries Limited, कोलकाता येथील CSR प्रमुख श्री. निशांत सिन्हा यांनी Y4J / अनामप्रेम प्रशिक्षण व प्लेसमेंट केंद्र, अहिल्यानगर येथे सदिच्छा भेट दिली.**

यावेळी त्यांनी केंद्रातील Y4J प्रशिक्षण व रोजगार व्यवस्था याचे निरीक्षण करून विशेष कौतुक केले. प्रशिक्षण प्रक्रियेबाबत सखोल माहिती घेतली आणि केंद्राच्या उत्कृष्ट कार्यप्रणालीबद्दल समाधान व्यक्त केले.

भेटीदरम्यान, मोबिलायझेशन आणि प्लेसमेंटसंबंधित धोरणांवर सविस्तर चर्चा झाली. Exide Industries Limited च्या अहमदनगर प्लांटमध्ये भविष्यात अधिक उमेदवारांना नोकरीच्या संधी देण्याची तयारी त्यांनी दर्शवली.

ही भेट या केंद्राच्या कार्यकुशलतेवर एक प्रकारचा शिक्कामोर्तब करणारी ठरली असून, प्रशिक्षणार्थींना भविष्यात आणखी संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



राहुरी,जिल्हा अहिल्यानगर येथे आयोजित अनामप्रेम संस्था, युथ फॉर जॉब, प्रहार दिव्यांग संघटना आणि दिव्यांग शक्ती सेवा संस्था, राहुरी यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांसाठी भव्य नोकरी व व्यवसाय कर्ज मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन.

या उपक्रमाच्या माध्यमातून दिव्यांग व्यक्तींना शिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार कर्ज योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. उपस्थित सर्व दिव्यांग बांधवांना अनामप्रेम संस्थेच्या कार्याची ओळख करून देण्यात आली. गौरांग अभिनव शाळा, आधार ग्राम स्पायनल कॉर्ड रिहॅबिलिटेशन सेंटर, उद्योग भवन आणि विविध पुनर्वसन उपक्रमांची माहिती दिली गेली.

यावेळी उपस्थितांना आवाहन करण्यात आले की, जास्तीत जास्त संख्येने अनामप्रेम प्रकल्पांना भेट द्यावी व संस्थेच्या कार्यात सहभागी व्हावे.

हा कार्यक्रम उत्साही, प्रेरणादायी आणि मार्गदर्शक ठरला, याचे सर्व सहभागी संस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आले.



**दिव्यांग कल्याण विभाग, पुणे येथून बदली होऊन दिव्यांग कल्याण विभाग, अहिल्यानगर येथे नुकतेच पदभार स्वीकारलेले समाजकल्याण अधिकारी मा. श्री. प्रशांत गायकवाड यांचे अनामप्रेम संस्थेचे अध्यक्ष इंजि. अजित माने सर व अनामप्रेम टीम यांच्यातर्फे नॅपकिन बुके देऊन स्वागत करण्यात आले.**

या प्रसंगी अनामप्रेम संस्थेच्या वतीने सध्या राबविण्यात येणाऱ्या विविध दिव्यांग पुनर्वसन उपक्रमांची माहिती मा. गायकवाड साहेबांना देण्यात आली. तसेच अनामप्रेम उद्योग भवन उद्घाटन समारंभाचे निमंत्रण व संस्थेच्या प्रकल्पास भेट देण्याचे स्नेह निमंत्रणही यावेळी त्यांना देण्यात आले.

यावेळी विशेषत: अनामप्रेम गौरांग अभिनव शाळा प्रस्ताव व नमो दिव्यांग कौशल्य विकास केंद्राच्या प्रस्तावासंदर्भातील प्रलंबित विषयांवर सविस्तर चर्चा झाली. सदर विषयांना गती देण्यासाठी साहेबांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.



Scanned with OKEN Scanner

# ANAMPREM
# MARATHWADA PROJECT

MAY -2025

## प्रकल्पाचे उपक्रम व संस्था भेटीचे निमंत्रण





वसंतराव नाईक कॉलेज येथील पर्यवेक्षक आणि प्रभारी प्राध्यापक श्री. विवेकानंद थोरमोटे सर यांची भेट.

मेहरसिंग नाईक महाविद्यालय येथील प्राचार्य मा.संजय पंदीकर सर यांची भेट





वसंतराव नाईक महाविद्यालय संभाजीनगर येथील प्राचार्य डॉ. संजयजी शिंदे सर यांची भेट.

पंडित जवाहरलाल नेहरू महाविद्यालय छत्रपती संभाजी नगर येथील प्रोफेसर डॉक्टर संजय मुन यांची भेट





WIMA प्रदर्शनातील अनामप्रेमचा सहभाग -

WIMA संघटनेच्या प्रदर्शनात अनामप्रेमला मोफत स्टॉल मिळाला होता. यानिमित्ताने सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी ओळख झाली.





श्री सुनीलजी रामेश्वर तोतला व श्री अनिलजी तोतला बंधूंनी आपल्या मातोश्री श्रीमती अलकनंदा ताई तोतला यांच्या ८१व्या वाढदिवसानिमित्त अनामप्रेम संस्थेला "तुला" दानाचा अर्धा हिस्सा म्हणून साखर भेट दिली.

सरस्वती भुवन एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्सचे प्राचार्य डॉक्टर अनिलजी चौधरी सर यांची भेट



आदर्श विवाह सोहळा आणि अनामप्रेमला मदतीचा हात - श्री अशोकजी लोखंडे यांचा मुलगा चि. उमेश याच्या साखरपुडा समारंभातच त्याचा शुभविवाह अगदी साधेपणाने आणि अनावश्यक खर्चाला फाटा देत करण्यात आला. यावेळी त्यांनी संस्थेला आर्थिक मदतही केली.



Scanned with OKEN Scanner

# SCHOOL UPDATE







**अनामप्रेम संस्था संचलित गौरांग अभिनव शाळेच्या टीमने संगमनेर तालुक्यात प्रभावी सर्वेक्षण मोहीम राबवली.**

या सर्वे अंतर्गत विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या पालकांशी संवाद साधून गौरांग शाळेचे कार्य, शिक्षणपद्धती, सुविधा व अनामप्रेम संस्थेचे विविध उपक्रम यांची सविस्तर माहिती त्यांना देण्यात आली.

पालकांना आपल्या मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी गौरांग शाळेत प्रवेश घेण्यास प्रोत्साहित करण्यात आले. याचबरोबर अनामप्रेम प्रकल्पास प्रत्यक्ष भेट देण्याचे आवाहन करण्यात आले, जेणेकरून संस्थेचे कार्य त्यांना जवळून अनुभवता येईल.

हा सर्वेक्षण उपक्रम यशस्वी ठरून अनेक नवीन विद्यार्थ्यांपर्यंत अनामप्रेमचे कार्य पोहोचले आहे








Scanned with OKEN Scanner









## तिमिराकडून तेजाकडे... सत्यमेव जयते ग्राम अखेर प्रकाशमान झाले

**31 मे 2025 रोजी अनामप्रेम संस्थेच्या 'सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प, निंबळक (अहिल्यानगर)' येथे थ्री फेज वीज जोडणीचे काम यशस्वीपणे पूर्ण झाले. अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न सोडवून अखेर गावठाण येथून वीजपुरवठा सुरू झाला आहे.**

**या प्रकल्पात सध्या 150 दिव्यांग विद्यार्थी व लाभार्थी निवासी असून, यामुळे गौरांग शाळा, वसतिगृह, गोशाळा, शेती प्रकल्प व उद्योग भवन या सर्व उपक्रमांना आता नियमित आणि पुरेशा प्रमाणात वीज मिळणार आहे.**

**या ऐतिहासिक टप्प्यापर्यंत पोहोचण्यासाठी संस्थेचे पदाधिकारी, कार्यकर्ते व स्वयंसेवक यांनी दोन वर्षांहून अधिक काळ सातत्याने पाठपुरावा केला.**
**हा प्रकाशाचा विजय दिव्यांग विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची नांदी ठरणार आहे.**

## योगातून शक्ती आणि संतुलनाचा अनुभव...

अनामप्रेम संस्थेतील अंध व मूकबधिर विद्यार्थ्यांना श्री राम अवतार मानधना चॅरिटेबल ट्रस्ट, बाल भवन येथे योगा सत्रासाठी घेऊन जाण्यात आले. या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्तम सहभाग घेतला आणि आपल्या कौशल्याची झलक दाखवली.

अंध विद्यार्थिनी राधा यादव व मूकबधिर गणेश शिंदे यांनी रोप मल्लखांब सारखा कौशल्यपूर्ण खेळ अत्यंत सुंदरपणे सादर केला, तर बळीराम यादव यांनी प्रभावी योगाभ्यास करून उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमादरम्यान प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व, शारीरिक आणि मानसिक आरोग्यावर होणारे फायदे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

योगाच्या माध्यमातून आत्मविश्वास, एकाग्रता आणि शारीरिक ताकद याचा सुंदर संगम विद्यार्थ्यांच्या सादरीकरणातून दिसून आला.







Scanned with OKEN Scanner

"श्री गोंदवलेकर महाराज देवस्थान, गोंदवले यांच्या सौजन्याने आणि संस्थेच्या आधारस्तंभ डॉ. मेघना मराठे यांच्या मोलाच्या पुढाकाराने अनामप्रेम संस्थेला तब्बल 5 टन किराणा साहित्याची मदत प्राप्त झाली आहे.

ही मदत दिव्यांग बांधवांच्या पुनर्वसन कार्यात मोठा आधार ठरणारी आहे. संस्थेतील निवासी विद्यार्थी, प्रशिक्षणार्थी व गरजू लाभार्थ्यांसाठी ही मदत अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.





सेवेला समर्पित जीवनात एक नवे वळण...

दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण व रोजगारासाठी कार्य करणाऱ्या अनामप्रेम संस्थेचा समर्पित कार्यकर्ता चि. रामदास व सौ. दीपाली यांचा विवाह सोहळा चिचोंडी (शिराळ), ता. पाथर्डी येथे आनंद आणि उत्साहात संपन्न झाला..

ही केवळ दोन व्यक्तींची नव्हे, तर सेवाकार्यात समर्पित दोन हृदयांची सुंदर भेट आहे.
या शुभक्षणी अनामप्रेम टीमने त्यांना त्यांच्या भावी वैवाहिक जीवनाच्या सफलतेसाठी भरभरून शुभेच्छा..!



**श्रम ही श्रीराम हमारा**

**अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे स्नेहालय संचलित स्नेहांकुर दत्तक केंद्र, सक्षमा आणि स्नेहदीप प्रकल्पांना मोठ्या प्रमाणावर नुकसान सहन करावे लागले आहे. पुराच्या पाण्यामुळे भिंती कोसळल्या, पुस्तके, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, फर्निचर वाहून गेले, तसेच वाहनेही खराब झाली या कठीण काळात अनामप्रेमच्या दिव्यांग मुलांनी व कार्यकर्त्यांनी श्रमदान करून परिसर स्वच्छ करण्यास मदतीचा हातभार लावला..
संकटात एकत्र येऊया... आणि आशेचे दीप पेटवूया.**






# ANAMPREM Visitors








## अनामप्रेम संस्थेत अशोक लेलँड कंपनीचे नवीन वाहन दाखल- सेवा कार्यासाठी एक नवा वेग

अनामप्रेम संस्थेला मिळणाऱ्या किराणा व वस्तुरूप मदतीचे वहन सुरळीतपणे करता यावे यासाठी आवश्यक असलेला Ashok Leyland कंपनीचा मालवाहू टेम्पो संस्थेच्या सेवेत दाखल झाला आहे.
यावेळी संस्थेचे अध्यक्ष इंजी. अजित माने, सचिव श्री. अनिल गावडे तसेच सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.
ही सुविधा संस्थेच्या सेवाभावी कार्याला नवी गती देणार आहे






Scanned with OKEN Scanner



प्रेम, सेवा आणि समर्पणाच्या पायावर उभ्या असलेल्या 'अनामप्रेम' संस्थेचे आधारस्तंभ इंजि. अजित माने साहेब आणि सौ. अनिता माने यांची सुपुत्री समृद्धी हिचा विवाह संभाजीनगरचे रहिवासी सौ सविता व श्री शिवाजी नाईकवाडे यांचे पुत्र आकाश यांच्यासोबत दिनांक 24 मे रोजी आनंदात आणि उत्साहात संपन्न झाला..
या शुभप्रसंगी स्नेहालय व अनामप्रेम परिवाराचे सर्व सदस्य एकत्र येऊन नवविवाहित दांपत्याच्या नवजीवनाच्या शुभारंभाचे साक्षीदार झाले.

समृद्धी व आकाश यांच्या आयुष्यात प्रेम, विश्वास, आणि आनंदाची नवी पहाट उगवो हीच शुभेच्छा..!



वृक्षारोपण मोहीम करिता पूर्वतयारी





अनामप्रेम सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प येथे तार कंपाऊंडचे काम यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आले आहे.
संस्थेच्या सुरक्षिततेसाठी व सुव्यवस्थेसाठी हे काम महत्त्वाचे होते.



Scanned with OKEN Scanner

# MAHESH GUPTA

## पुनर्जीवनाकडे यशस्वी वाटचाल - श्री. महेश कुमार गुप्ता



जेव्हा जीवनाने हरवलेली वाट दाखवण्यास नकार दिला,
तेव्हा धैर्य, आशा आणि सेवाभाव यांच्या प्रकाशात त्यांनी नवा मार्ग शोधला!

आज आपण अशा एका व्यक्तीविषयी जाणून घेणार आहोत, ज्यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून विस्कटलेल्या आयुष्याला पुन्हा आकार दिला — श्री. महेश कुमार गुप्ता.



**सुरुवातीचा संघर्ष -**
**सामान्य परिस्थितीशी झगडून स्वतःची विश्व निर्मिती**

महेश कुमार गुप्ता यांचा जन्म 01 फेब्रुवारी 1979 रोजी उत्तर प्रदेशातील कानपूर या शहरात झाला. घरची परिस्थिती अत्यंत हालाखीची होती. आई-वडील शेती करून आपला संसार चालवायचे. गरिबी, मर्यादित साधनसामग्री आणि योग्य मार्गदर्शनाचा अभाव असूनही महेशजींनी आपले प्राथमिक व माध्यमिक शिक्षण कानपूर येथे पूर्ण केले.

जसे अन्य तरुणांचे स्वप्न असते तसेच तेही चांगल्या नोकरीसाठी प्रयत्नशील होते. एके दिवशी त्यांची स्वप्नपूर्ती झाली आणि त्यांना सरस्वती ज्ञान मंदिर इंटर कॉलेज, कानपूर येथे लॅब असिस्टंट म्हणून त्यांना नोकरी मिळाली. नोकरीमुळे आयुष्य आता स्थिरस्थावर होण्यास मदत झाली होती.

**कुटुंबाचा उदय -**

सन 1998 मध्ये, महेशजींचा विवाह रितूजी यांच्यासोबत झाला. त्यानंतर काही वर्षात या दांपत्यांच्या जीवनात 3 गोंडस फुले (2 मुली, 1 मुलगा) बहरली. या परिवाराचे आयुष्य शांत, सुखद आणि समाधानकारकपणे सुरु होते... परंतु नियतीने वेगळेच काही ठरवले होते.



Scanned with OKEN Scanner

**नियतीचा जबरदस्त घाव**

महेशजींच्या विद्यालयामध्ये एका कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. हा कॅम्प यशस्वी करण्यासाठी महेशजी व त्यांच्या विद्यालयातील सर्वजण खूप मेहनत घेत होते. या कॅम्पच्या शेवटच्या दिवशी महेशजींनी स्वत: 20-25 किलोचा एक मोठा स्पीकर उचलला आणि तेवढ्यात त्यांच्या मानेत विजेसारखी चमक भरली. ते अस्वस्थ झाले. त्या रात्री त्यांना झोपच लागली नाही, शरीराला खुप वेदना होत्या.
दुसऱ्या दिवशी तर त्यांना जागेवरून उठणेही शक्य होत नव्हते. हाता-पायासहित शरीराच्या कुठल्याही अवयवाची हालचाल करता येत नव्हती. परिस्थिती अत्यंत गंभीर झाली होती.

**रुग्णालय, ऑपरेशन आणि अपयश -**

कानपूर येथील नामवंत न्युरो सर्जन डॉ. शैलेश कुमार यांनी तपासणीनंतर सांगितले की, मानेची मुख्य शीर दबली गेली आहे, आणि तातडीने ऑपरेशन करणे आवश्यक आहे. डॉक्टरांच्या या सल्ल्यानुसार महेशजींच्या परिवाराने आतापर्यंत जमवलेली सर्व मिळकत ऑपरेशनसाठी खर्च केली. ऑपरेशनही झाले, परंतु महेशजींच्या प्रकृतीत काहीच सुधारणा झाली नाही. त्यानंतर त्यांनी सहा महिने फिजिओथेरपी देखील केली. मात्र, त्याचाही काही उपयोग झाला नाही. आर्थिक क्षमता संपल्याने खिन्नपणे ते पुन्हा आपल्या घरी आले – पूर्णतः अंथरुणाला खिळलेले, दुसऱ्याच्या मदतीशिवाय एक पाऊलही चालू न शकणारे.

**गंभीर संकटात आयुष्याची होरपळ**

आजारपणामुळे रोजगार संपला, शरीर हालचाल करत नव्हते, मिळकत तर केव्हाच संपली होती, आता जीवनाची आशा सुद्धा संपत चालली होती.
गंगा नदीने घर वाहून नेले, सर्व काही उध्वस्त झाले, जगायचं कसं कळेनासं झालं…

**दिसला एक आशेचा किरण – अनामप्रेमचा स्पर्श -**

मित्रांच्या चर्चेतून त्यांना "अनामप्रेम, अहिल्यानगर" येथील यशवंत प्रकल्प, आधारग्राम या स्पायनल कॉर्ड एन्जुरी रिहॅब सेंटर मध्ये उपचार, निवास व भोजन विनाशुल्क दिले जाते अशी माहिती मिळाली. त्यांनी लगेच अनामप्रेमच्या कार्यकर्त्यांशी संपर्क साधला. अनेक शंका, अनामिक भीती आणि बरे होण्याची अनिश्चितता यामुळे आलेले दडपण त्यांनी सकारात्मक विचाराअंती झुगारत त्यांचा मुलगा आणि मुलीसोबत अहिल्यानगर गाठले.

जेव्हा ते अनामप्रेमच्या स्पायनल कॉर्ड इंजुरी सेंटर, आधारग्राम येथे पोहोचले, तेव्हा त्यांची शारीरिक स्थिती इतकी नाजूक होती की त्यांना चार लोकांनी उचलून बेडवर ठेवावे लागले.



Scanned with OKEN Scanner

नवीन आयुष्य देणारा प्रवास -

आधारग्रामचे शहरापासून दूर असे प्रदूषणमुक्त, शुद्ध व प्रसन्न नैसर्गिक वातावरण, शुद्ध शाकाहारी व सात्विक भोजन, प्रत्येक पेशंटला तज्ञ फिजिओथेरपिस्ट डॉक्टरांकडून मिळणारी फिजिओथेरपी, व्यायामाची साधने आणि वेळापत्रकानुसार चालणारे तणावमुक्त जीवन ही त्यांच्या पुनर्जन्माची सुरुवात ठरली. फिजीओथेरपी मुळे त्यांच्या स्नायूंना व अवयवांना बळकटी यायला लागली. काही दिवसातच ते स्वतः उठून बसू लागले. बेड वरून व्हीलचेअर वर शिफ्ट होऊ लागले. त्यानंतर वॉकर व पॅरलल बारवर ते उभे राहू लागले. पूर्वी ज्या हातांची, बोटांची हालचाल होत नव्हती, आता त्याच हातांनी ते जेवणही करु लागले. शारीरिकच नव्हे तर मानसिकदृष्ट्याही त्यांच्यात मोठा सकारात्मक बदल झाला.

आजचे महेशजी – एक खळाळणारे नवचैतन्य

महेशजी सांगतात की, "आधारग्राम सेंटर म्हणजे केवळ उपचार नव्हे, तर ती एक पुनर्रचना आहे!"
येथे निसर्गरम्य परिसर, सेवाभावी कार्यकर्ते, अपार सहकार्य, आणि मायेने आत्मविश्वास देणारे मार्गदर्शक आहेत.
येथे आलेला कोणीही रिक्त हस्ते जात नाही, काहीतरी नवं, सकारात्मक, उभारी देणारं घेऊनच जातो. येथे खरोखरच नवजीवन मिळते.

महेशजींच्या शब्दांतून फुललेले काव्य

झाडावरून एक पान गळाले, ते तलावात अलगद पडले...
जीवन-मरणाच्या या संघर्षात,
पानरुपी मला, अनामप्रेममुळे नवजीवन मिळाले.

जीवनात अनंत अडचणी आल्या तरी माघार घेऊ नका, प्रयत्न सोडू नका.!
श्री. महेश कुमार गुप्ता यांचा हा जीवनप्रवास प्रत्येकासाठी धैर्य, श्रद्धा आणि सेवाभावाने घडलेल्या पुनर्जन्माची साक्ष देत आहे.



श्री.महेश गुप्ता अनामप्रेम फिजिओथेरपी सेंटरमध्ये उपचार घेताना.

Scanned with OKEN Scanner

स्थापना 2005
अनामप्रेम

# ANAMPREM SKILL DEVELOPMENT CENTRE
# UDYOG BHAVAN

"CHANGE-MAKERS" For Differently Abled
अनामप्रेम

# Anamprem Products



## 1. Napkin bouquet

"दिव्यांग बांधवांनी तयार केलेले नॅपकिन बुके विक्रीसाठी उपलब्ध - त्यांच्या कौशल्याला प्रोत्साहन द्या, आणि विशेष उपक्रमात सहभागी व्हा!"

## 2.Sathi chappal udyog

दिव्यांग बांधवांनी आत्मनिर्भरतेच्या दिशेने टाकलेलं महत्त्वाचं पाऊल - त्यांनी तयार केलेल्या साथी चप्पल विक्रीसाठी उपलब्ध आहेत.
आपल्या खरेदीतून त्यांना प्रेरणा आणि आधार मिळेल.
कृपया पुढे येऊन हे उत्पादने खरेदी करा आणि त्यांच्या मेहनतीस हातभार लावा!










## 3. Gir Cow Lonkadh Ghee

अनामप्रेम संस्थेच्या गोशाळेत पारंपरिक पद्धतीने तयार केलेले शुद्ध तूप आता विक्रीसाठी उपलब्ध आहे.
हे तूप केवळ दर्जेदारच नाही, तर संस्थेच्या सेवाभावी कार्यासही मदतीचे हात देणारे आहे.
कृपया हे तूप खरेदी करून सेवेसोबत स्वादालाही साथ द्या.!



## 4. Bahuguni Anamamrut

अनामप्रेम संस्थेचे "अनामामृत बहुगुणी थेंब" आता विक्रीसाठी उपलब्ध!
दिव्यांग बांधवांनी तयार केलेले... नैसर्गिक, सुरक्षित आणि बहुगुणी!
उपयोग:
सर्दी, खोकला, कफ, अपचन, दाढदुखी यावर गुणकारी
माऊथ फ्रेशनर म्हणूनही उत्तम!
आरोग्यवर्धक थेंब... सेवाभावातून तयार!





## 5. Sanitary Pad

स्वच्छतेची काळजी, सन्मानाची साथ!
अनामप्रेम संस्थेच्या उद्योग भवनात दिव्यांग बांधवांनी तयार केलेले सॅनिटरी पॅड्स आता विक्रीसाठी उपलब्ध
आहेत. हे पॅड्स सुरक्षित आणि आरोग्यदायी असुन स्त्रियांसाठी त्यांची खरीखुरी सखीच आहेत. स्वावलंबनाचं प्रतीक!



अनामप्रेम दिव्यांगनिर्मित उत्पादने मिळवण्याकरिता व अधिक माहितीसाठी संपर्क -7350013805

www.anamprem.org

Scanned with OKEN Scanner

## ॥ शैक्षणिक मदतीसाठी विनम्र आवाहन ॥

**2025-2026 या नवीन शैक्षणिक वर्षात दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी हवी आहे तुमची साथ..!**

**आदरणीय हितचिंतक,**

**सप्रेम नमस्कार..!**

**अनामप्रेम संस्था मागील 20 वर्षांपासून दिव्यांग मुलांच्या शिक्षण, प्रशिक्षण व स्वावलंबनासाठी अहोरात्र कार्यरत आहे. आज संस्थेच्या हिंमतभवन वसतिगृह, सत्यमेव जयते ग्राम प्रकल्प - निंबळक, अनामप्रेम पुणे प्रकल्प तसेच छत्रपती संभाजीनगर येथील मराठवाडा प्रकल्पात एकूण 300 + दिव्यांग विद्यार्थी आणि लाभार्थी निवासी राहून शिक्षण घेत आहेत. संस्थेला कोणत्याही प्रकारची शासकीय मदत/अनुदान मिळत नाही. आपल्यासारख्या संवेदनशील, समाजहितासाठी नेहमीच पुढे येत असलेल्या दात्यांमुळेच हे कार्य करणे आम्हाला शक्य होत आहे.**

**आपण जाणताच आहात की, नवीन शैक्षणिक वर्ष सुरू झाले असून, अनामप्रेम मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, वह्या, पुस्तके, युनिफॉर्म, बूट, शालेय बॅग आणि इतर आवश्यक गोष्टींची नितांत गरज आहे.**

**या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजेसाठी या महिन्यात किमान ₹500 ते ₹1000 इतका खर्च अपेक्षितआहे.**

**आज आपण एका गरजवंत दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा खांदा व्हाल का...?**
**तुमच्या छोट्याशा मदतीमुळे एखाद्या दिव्यांग विद्यार्थ्याचे आयुष्य प्रकाशमान होऊन उजळू शकते..!**

**तुमचे आर्थिक योगदान या मुलांसाठी आशेचा किरण ठरणार आहे.**

**₹500 – शालेय साहित्य**
**₹1000 – युनिफॉर्म व पूर्ण शैक्षणिक साहित्य**

**आपली मदत म्हणजे या मुलांसाठी सुरू होऊ शकणारा एक नवा अध्याय...**

**अनामप्रेम – दिव्यांगांच्या आयुष्याला नवी दिशा देणारी एक व्रतस्थ वाटचाल..**

**अनामप्रेमला दिलेल्या देणग्यांना 80G कलमान्वये आयकरात सवलत मिळते.**

### ANAMPREM CONTACT & BANK DETAILS

- **Himmat Bhavan Project - 7350013806 , 9011004576**
- **S.J Gram Project - 7350517778 , 9011670123**
- **Marathwada Project. - 9921509199 , 9011750035**
- **Anamprem Pune Hostel. - 9422307116 , 9011750022**

| | |
|---|---|
| बँकेचे नांव Bank Name | सेंट्रल बँक ऑफ इंडिया Central Bank of India |
| शाखा Branch | अहमदनगर (महा) Ahmednagar (MH) |
| खाते क्रमांक/A/c No. : 3486669726 | |
| आय.एफ.एस.सी.कोड/IFSC Code : CBIN0280670 | |

ANAMPREM
10252110@cbin

**हे मासिक पत्रक मा.अध्यक्ष अनामप्रेम गांधी मैदान, अहिल्यानगर येथून प्रकाशित केले आहे.**

**/ANAMPREM**

**YOU TUBE** **INSTAGRAM** @ANAMPREM_2005 **FACEBOOK**

Scanned with OKEN Scanner

भारत सरकार
Government of India

आधार

Aadhaar no. issued: 28/11/2011



सोनाली साहेबराव जाधव
Sonali Sahebrao Jadhav
जन्म तारीख/DOB: 01/01/2000
महिला/ FEMALE

**आधार हा ओळखीचा पुरावा आहे, नागरिकत्व किंवा जन्मतारखेचा नाही.**
हे फक्त पडताळणीसाठी वापरले जावे (ऑनलाइन प्रमाणीकरण किंवा Qr कोडचे स्कॅनिंग/ ऑफलाइन XML)
**Aadhaar is proof of identity, not of citizenship or date of birth.** It should be used with verification (online authentication, or scanning of QR code / offline XML).

**6773 0237 0784**

माझे आधार, माझी ओळख

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण
Unique Identification Authority of India

AADHAAR

Details as on: 11/10/2024

पत्ता:
D/O साहेबराव जाधव, वानेगाव बु., फुलंब्री, औरंगाबाद,
महाराष्ट्र - 431111

Address:
D/O Sahebrao Jadhav, VANEGAON BU.,
Fulambri, DIST: Aurangabad,
Maharashtra - 431111

**6773 0237 0784**
**VID : 9142 0030 3754 2440**

1947 | help@uidai.gov.in | www.uidai.gov.in

Scanned with OKEN Scanner

भारत सरकार

Government of India

Aadhaar no. issued: 28/11/2011



सोनाली साहेबराव जाधव

Sonali Sahebrao Jadhav

जन्म तारीख/DOB: 01/01/2000

महिला/ FEMALE

**आधार हा ओळखीचा पुरावा आहे, नागरिकत्व किंवा जन्मतारखेचा नाही.**
हे फक्त पडताळणीसाठी वापरले जावे (ऑनलाइन प्रमाणीकरण किंवा Qr कोडचे स्कॅनिंग/ ऑफलाइन XML)

**Aadhaar is proof of identity, not of citizenship or date of birth.** It should be used with verification (online authentication, or scanning of QR code / offline XML).

**6773 0237 0784**

माझे आधार, माझी ओळख

Scanned with OKEN Scanner

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरण

Unique Identification Authority of India

AADHAAR

पत्ता:
D/O साहेबराव जाधव, वानेगाव बु., फुलंब्री, औरंगाबाद,
महाराष्ट्र - 431111

Address:
D/O Sahebrao Jadhav, VANEGAON BU.,
Fulambri, DIST: Aurangabad,
Maharashtra - 431111

Details as on: 11/10/2024

**6773 0237 0784**

**VID : 9142 0030 3754 2440**



Scanned with OKEN Scanner